VOL- VII ISSUE- III MARCH 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# भारतातील सामाजव्यवस्था व मानवी हक्क/मानवाधिकार : एक दृष्टीक्षेप

डॉ. कैलास सर्जेराव मोटे
स. प्राध्यापक
एस एस जे पी बी.एड./एम.एड. कॉलेज,
आळणी–उस्मानाबाद

भारत हा विविधतेने नटलेला व लोकशाही प्रधानदेश आहे. जगाच्या पातळीवर सर्वात मोठी लोकशाही ही भारतात आहे. भारतानेच जगाला सत्य, अहिंसा, सामजिक न्याय, बंधुता या अधिकाराची देणगी दिलेली आहे. जगातील बहुसंख्य देशामध्ये राजेशाही व अध्यक्षीय शासन प्रणाली आहे. एवढेच नव्हे तर आज जगातील बहुसंख्य देशामध्ये हुकुमशाही अस्तीत्वात आहे. लोकशाही आहे पण लोकशाही आहे पण ती संकुचित स्वरूपाची यामुळे लोकांच्या जन्मजात स्वातंत्र्यावर बंधने आलेलीआहेत. स्वतःचे वर्चस्व रहावे, जगातील इतर देशावर आर्थीक, राजनैतिक, औधोगीक वर्चस्व रहावे या भूमिकेतून काही देश प्रयत्न करत होते व आहेतया महत्त्वकक्षेतूनच पहिल्या व दूस–या महायुध्दाची बीजे पेरली गेली. या महायुध्दाने तर मानवी अस्तीत्व नाहीसे होते की काय अशी परिस्थीती निर्माण झाली होती.या भितीनेच काही विचारवंताच्या संकल्पनेतून मानवी हक्काची संकल्पना पुढे आली. जागतीक स्तरावरील मानवी हक्काच्या इतिहासाचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा आपणाला असे लक्षात येते की, आधुनिक मानवी हक्क चळवळीस दुस–या महायुध्दानंतर जोर मिळाला आसला तरी ही संकल्पना सर्वच धर्माच्या संस्कृती आणि तत्वज्ञानात आढळते. ज्ञात इतिहासात मानवी हक्का विषयीचा सर्वात जुना संदर्भ इस पूर्व 2350 सालातील लगारा मधील उरूकागिना येथील सुधारणे बाबत येतो त्या नंतर नव सुमेरियन संस्कृतीतील उरनम्मुच्या संहितेमध्ये आढळतो. प्राचीन इराणी साम्राज्याने इसवूर्व 539 साली घोषीत केलेली सायरस वृत्तचिती हा मानवी हक्का विषयीचा पहिला लिखित दस्ताऐवज मानण्यात येतो. या वृत्तचिती व्दारे गुलामीची प्रथा संपूष्टात आणण्यात आली. 1864 मध्ये जिनिव्हा जाहिरनामा अस्तित्वात येऊन अशाप्रकारे मानवी हक्कांना मान्यता मिळण्यास आणि त्यांना मुर्त स्वरूप येण्यास सुरूवात झाली आणि मानवी हक्कांना प्राधान्य मिळाले. इस्लाम धर्माच्या उदयानंतर अरबस्तानात मानवी हक्कांना स्थान प्राप्तझाले. नैसर्गिक हक्कांची संकल्पना सॉक्रेटिस आणि त्यांचे विचारवंत वारसदार प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनीही उचलून धरली होती. त्याचा उल्लेख विविध ग्रंथामध्ये सापडतो.

मानवी हक्काची संकल्पना प्रथम युरोप खंडात 19 व्या शतकात उदयास आली. सेंट थॉमस ॲक्वायन्स हा ग्रीक तत्ववेता मानवी हक्काचा जनक मानला जातो. जॉन पीटर्स हंफ्र हा कॅनडा देशाचा नागरिक मानवाधिकराच्या वैश्विक घोषणापत्राचा प्रमुख मसुदाकार होता असे म्हटले जाते.

मानवाधिकाराची संकल्पना :

1. थॉमस पेन यांने मानव अधिकाराला नैसर्गिक अधिकार असे म्हटले आहे.
2. जे हक्क कायदेशीर हक्क म्हणून मान्य झाले आहेत, त्यांना मानवी हक्क म्हणतात. हक्क व प्रतिष्ठा या दृष्टीने सर्व मानव समान आहे. प्रत्येक मानवाच्याठायी नैतिक दृष्या हक्क स्वाभाविक असतात.
3. बेंथम– कायद्याने मान्य केलेली व्यक्तीची मागणी म्हणजे हक्क होय.
4. संयुक्त राष्ट्र संघाचे महासचिव –मानवी हक्काचे तत्वज्ञान म्हणजे मानवाची भितीपासून मुक्तता होय.

अशा प्रकारे मानवी हक्काची संकल्पना स्पष्ट करण्यात आलेली आहे. म्हणजे आपणास असे म्हणता येते की, व्यक्तीचा जन्म होतो तो बंधन विरहीत नंतरच

मानवाच्या भोवती बंधनाचे जाळे विनले जाते. याच्या कारनांचा विचार केला तर असे लक्षात येते की, एका व्यक्तीला दूसऱ्या व्यक्तीपासून विनाकारण त्रास होऊ नये इजा होऊ ये हा त्या मागचा हेतू आहे.

मानवाधिकार कायद्यामागील भूमिका –

1. मानवाला जन्माबरोबर जे अधिकर प्राप्त झालेले असतात ते प्राप्त करून देणे.
2. मानवी जीवन उंचावणे.
3. मानवाची गुलामीतून मुक्तता करणे.
4. मानवाचे जन्मजात हक्क प्राप्त करून देणे.
5. ज्या व्यक्तीचे हक्क बाधित झाले आहेत ते त्या व्यक्तीला प्राप्त करून देणे.
6. समाजिक स्थैर्य प्राप्त करणे.

मानवधर्माच्या रक्षणासाठी प्रत्येक देशाने आपल्या राष्ट्राला प्राधान्य देऊन कायदे केले आहेत. भारतातील मानवी हक्का संदर्भात जेव्हा आपण विचार करतो तेव्हा असे लक्षात येते की, पूर्वी भारतामध्ये जी वर्ण व्यवस्था होती त्या वर्ण व्यवस्थेमुळे सर्व सामन्यांचे हक्क बाधित झाले होते.वर्ण व्यवस्थेवर आधारीत समाजरचना भारतात होती. पुढे यात बदल होत गेले व समाज व्यवस्था, व्यक्तीचे कर्तृत्त्व, व्यक्तीची संपत्ती व शिक्षण यावर आधारीत निर्माण झाली. अशा व्यक्तीच्या हाती सर्व सामान्याच्या जगण्याची दोरी आहे. नंतरच्या काळात सामाजिक क्रांतीतून बदल होत गेले. शिक्षणाचे वारे वाहू लागले व अन्यायाविरूध्द सर्व जनता उभी राहीली त्यामूळे सर्व सामान्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे जीवन व्यथीत करता येऊ लागले. आज मोठा फरक भारतीय समाज व्यवस्थेत झाला आहे असे म्हणता येणार नाही. अधिकारचे स्वरूप बदलले आहे. ज्याला कायदयाचे संरक्षण प्राप्त झाले आहे असा समाज व व्यक्ती इतर समाज व व्यक्तींना वेठीस धरतांना दिसत आहे. समतेचा अधिकार ज्यांच्यासाठी तयार केला तेच जर या अधिकराचा गैरवापर करत असतील तर समता,न्याय, बंधूता, स्वातंत्र्य या देशात निर्माण होणार नाही.

भारतामध्ये मानवी हक्काच्या रक्षणार्थ राज्यघटनेध्ये तरतूद करण्यात आली आहे. यामुळे मानवी हक्कांना एक संजिवणी प्राप्त झाली आहे. भारताने मानवी हक्कांच्या रक्षणासाठी राज्यघटनेत मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वांचा समावेश केला आहे. मानवी हक्कांच्या रक्षणासाठी 1955 साली अस्पृश्यता निवारणाचा कायदा केला. या कायदयाचा उददेश म्हणजे कोणीही स्पृश्य व अस्पृश्यता पाळणार नाही. तर अस्पृश्यता पाळली तर संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाख केला जात होता आज ही हा कायदा लागू आहे. पुढे 1993 साली मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली व यासाठी स्वतंत्र मानवाधिकार आयोग स्थापन केला हा आयोग देशातील दिन, दलित, शोषित, पिढीत, अत्याचार पिढीत व्यक्तिवर होणाऱ्या अन्यायाची दखल घेऊन ते नाहीसे करण्यासाठी काम करत आहे.

प्रमुख मानवी हक्क/मानवाधिकारः

1. जीवन जगण्याचा अधिकार
2. यातनापासून मुक्तता
3. कोर्ट सुनवाईचा अधिकार
4. भाषण स्वातंत्र्याचा अधिकार
5. वैचारिक व धार्मिक स्वातंत्र्य
6. अभिव्यक्ती स्वातंत्र्य
7. गुलामगिरीपासून मुक्तता
8. आचार विचाराचे स्वातंत्र्य

भारतीय राज्यघटना व मानवी हक्क/मानवाधिकार :


भारतीय राज्यघटना ही जागतीक मानवी हक्काशी जोडली गेली आहे. आंरराष्ट्रीय मानवी हक्क कायद्यानुसार भारतातील मानवी हक्काची तरतूद करण्यात आली आहे. 1946 ला मानवी हक्क आयोगाची स्थापना जागतीकपातळीवर करण्यात आली आणि 10 डिसेंबर 1948 रोजी जागतीक मानवी हक्काचा जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला, तर भारतीय राज्यघटना 26 जानेवारी 1950 ला अंमलात आली. जागतीक मानवी हक्क आयोगातील कलमे व भारतीय राज्यघटनेतील नागरिकांचे मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे हे जवळपास सारखेच आहेत. भारतीय राज्यघटनेच्या 12 ते 35 या कलमामध्ये मूलभूत हक्क व 36 ते 51 या कलमामध्ये मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आलेला आहे. यातून भारतीय नागरीकांच्या हक्काच्या रक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

भारतीय राज्यघटना ही भारतातील विविधतेला सामावून घेणारी सर्व समावेशक अशी आहे. भारत हा आशिया खंडातील विविध प्रदेशांनी व विविध जाती धर्मांच्या लोकांच्या वास्तव्याने निर्माण झालेला देश आहे. जगाच्या पातळीवर भारत हा एकमेव असा देश आहे की, ज्या देशात

सर्व प्रकारच्या जाती, धर्माचे लोक राहतात. या विधिधतेमुळे काही प्रमाणात धार्मिक व जातिय दंगे निर्माण होतात पण यातूनही प्रत्येक मानवी हक्काचे रक्षण करण्यासाठी शासन यंत्रणा प्रभावी कार्य करत आहे. यासाठी कायदे तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक व्यक्तिला कायदयाचे संरक्षण असल्याने येथील नागरीक आपल्या स्वतंत्र्याचा मुक्तपणे आनंद घेत आहे. भारतीय राज्यघटनेने स्वातंत्र्य समता, बंधुता व धर्मनिरपेक्षता ही बहुमोल तत्त्वे जागाला बहाल केली अहोत. या तत्वांना अनुसारूनच घटनाकांरांनी ही घटना तयार केली आहे व प्रत्यक्षात याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतीय राज्यघटना ही जगाला मानवी स्वातंत्र्याची दिलेली देणगी आहे. विविधतेत एकता हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्टे सांगता येईल. ही संस्कृती टीकवून ठेवण्याचे काम भारतीय राज्यघटनेने केले आहे.

भारतीय राज्यघटना ही एक आदर्श राज्यघटना आहे पण या राज्य घटनेच्या अंमलबजावणीमध्ये काही राज्य कर्त्यांच्या राजकीय लाभामुळे काही त्रुटी राहू लागल्या आहेत. त्यामुळे देशात समाजिक अस्थैर्याची समस्या निर्माण होतांना दिसत आहे. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये पूर्वी जाती, धर्मामूळे ज्या हिंसक घटना घडत होत्या त्या आजही घडत आहे, नव्हे याचे प्राबल्य वाढत आहे. याचे कारण म्हणजे अती धर्मांधता व जातियता होय. पूर्वी माझ्या धर्मातील व जातीतील लोकांवर दूसऱ्या समाजाने अन्याय केला आहे. त्याच्या सुडाची वा बदल्याची भावना आज शिकलेल्या तरूणामध्ये निर्माण झाली आहे समाज शिकला पण प्रत्येकामध्ये समाजिक व मानवतेची भावनारूजलेली नाही असे म्हणता येईल, यातून राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे असेच म्हणावे लागेल. याला ज्या गोष्टी कारणीभूत आहेत त्यातील एक महत्त्वाचे म्हणजे राजकिय पक्षांची ध्येय धोरणे असल्याचे दिसून येते. भारतामध्ये जे राजकीय पक्ष आहेत ते प्रत्येक धार्माला चिकटून आहेत. विशिष्ट धार्माचा आधार घेऊन किंवा त्या धर्माचे कार्ड पुढे करून निवडनूक प्रत्येक पक्ष लढत असल्याचे दिसून येत आहे. समाजिक सलोखा निर्माण व्हावा ही कोणत्याच पक्षाच्या जाहिरनाम्यात नमुद नसते. समाजातील धार्मिक व जातिय प्रश्न सोडवण्याकडे राज्य कर्त्यानी राजकीय लाभासाठी दूर्लक्ष केले आहे.

भारतीय समाज व्यवस्थेतील प्रमुख समस्या :




वरील प्रमुख समस्ये शिवाय 1. आरोग्य विषय सुविधा 2. दहशदवाद 3. सक्षम राजकीय व सामाजिक प्रतिनिधीत्वाचा अभाव 4. शेती व्यवसायावरील अनिष्ट परिणाम 5. निरक्षरता 6. हिंसा व गुन्हेगारी 7.बाल गुन्हेगारी व पोलिस कोठडीतील गुन्हे.

या व इतर ही समस्या या देशात आहेत. त्यामुळे सामाजिक स्थैर्य व ऐक्य निर्माण होण्यास बाधा येत आहेत याचा परिणाम देशाच्या शिक्षण पध्दती, समाजव्यवस्था व अर्थव्यवस्थेवर होऊन देशातील नागरिकांच्या व देशाच्या प्रगतीमध्ये अडथळे निर्माण होतांना दिसत आहेत.

देशात निर्माण होणाऱ्या समस्येमुळे मावीहक्क हे बाधीत होऊ लागले आहेत. आज भारताला स्वातंत्र्य मिळून 71 वर्ष पूर्ण होत आहेत. तरीही स्त्री व समाजातील दूर्लक्षीत व्यक्तीवरील अन्याय कमी होतांना दिसत नाहीत.भारतात शिक्षण पध्दतीवर विशेष लक्ष दिले जात आहे. शिक्षण सर्वाप्रत पोहचले आहे पण दर्जेदार व रोजगाराभीमूख शिक्षणाची उणिव भासतांना दिसते.

देशात शिक्षणाचे जाळे तांडा, वस्ती पर्यंत जाऊन पोहचले. पदवी घेऊन विद्यार्थी मोठया प्रमाणावर बाहेर पडत आहेत. पण दर्जेदार शिक्षण व मुलांना स्वावलंबी बनवणारे शिक्षणाची आजही उणिव असल्याने बेकारांची संख्या मोठया प्रमाणावर निर्माण होतांना दिसत आहे. जगातील नावाजलेल्या शिक्षण संस्थामध्ये भारतील शिक्षण संस्थांचा आलेख पाहिला तर तो शोधावा लागेल व तो शोधूनही सापडणार नाही. याचे कारण केंद्र सरकार, राज्यसरकार, संस्था प्रमुख नी समाजाला शहानपणाचे धडे देणारे शिक्षक/ प्राध्यापक यांच्यातील उदाशिनता हा आहे. पैसा व भौतिक सुविधांना अती महत्त्व प्राप्त झाल्याने सामाजिक बाधिंलकी कोणाकडेच राहिलेली नाही असे म्हणता येईल.

दर्जेदार शिक्षणाचा अभाव असल्याने शिक्षण सर्वापर्यंत पोहचले आहे असे म्हणणे चूकीचे होईल. यातून ही ज्या काही लोकापर्यंत पोहचले आहे.असे लोक स्वातःच्या स्वार्थासाठी भ्रष्ट मार्गाचा अवलंब करू लागले आहेत. वरील सर्वच समस्यांचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा असे लक्षात येते की, या समस्यामुळे मानवी हक्कावर विपरीत परीणाम होऊ लागले आहेत. यातील आज सर्व जगाला भेडसावणारी समस्या आहे ती म्हणजे दहशतवाद होय, या समस्येमुळे देशाच्या सिमावर्ती भागातील लोकांचे जीवन जगणेच अवघड झाले आहे. त्याच बरोबर देशाच्या सिमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांचे ही हाल होऊन जीवन मरणाचा खेळ सुरू आहे. यावर कोणत्याही सरकारने आज पर्यंत ठोस कार्यक्रम आखूण देश व देशांतर्गत शांततेला महत्त्व दिले नाही.

भारतीय समाजात दहशतवादामुळे होणारा मानवी हक्क भंग :

भारतीय समाजावार व समाजात राहणाऱ्या नागरिकावर दहशतवादामुळे खुप मोठया प्रमाणावर परिणाम झाला आहे. हिंसाचारी मार्गाचा वापर करून स्वतःचा धाक किंवा दहशत निर्माण करून दहशतवद अस्तिवात आला आहे. दहशतवाद हा कोणताही वाद किंवा विचार प्रणाली नाही, ती फक्त एक हिंसाचाराची विध्दवंशक प्रणाली आहे. हिंसक किंवा भयानक कृत्ये करून जनतेला व शासनाला जेरीस आणणे, नागरिकांना वेठिस धरने, नागरिकांत घबराहट, भिती निर्माण करणे या उददेशाने दहशतवादी संघटना कार्य करत आहेत.

प्रस्तापित राजकीय सत्तेविरूध्द नागरिकांना भडकावणे व नागरीकांना वेठीस धरने असे प्रकार दहशतवादी संघटनांकडून होत आहेत. दहशतवादामुळे भारतीय समाजावर विपरीत परिणाम झाला आहे.

दहशतवादामुळे भारतात निर्माण होणाऱ्या समस्या :

1. मनवी जीवितास धोका
2. आर्थीक नुकसान
3. सामाजिक मालमत्तेचे नुकसान
4. नागरिकांच्या आचार विचारावर बंधने
5. राजकिय अस्थैर्य निर्माण होते.
6. राष्ट्रीय सार्वभौमत्त्व आणि एकात्मतेला धोका निर्माण होतो.
7. सामाजिक अस्थैर्य व अशांतता
8. मानवी व भौतिक विकासाला बाधा वा नुकसान
9. शिक्षण

वरील समस्यामुळे समाजव्यवस्था, राजकारण, अर्थकारण, मानवी हक्क या गोष्टीवर परिणाम झाला आहे वा होतही आहे. यामुळे देशाच्या प्रगतीला व एकात्मतेला अडथळा निर्माण झाला आहे. सिमावर्ती भागातील लोकांचे जीवन जगणे कठीण झाले आहे. रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. शिक्षण व रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे युवकामध्ये बेकारीची समस्या मोठया प्रमाणावर निर्माण झाली आहे. या बेकारीमुळे युवक दहशतवादाकडे आकर्षीत होतांना दिसत आहे.

मानवी हक्काच्या रक्षणाची गरज :

1. मानवी हक्क हे जागतिक शांततेला पूरक आणि पोषक आहेत.
2. व्यक्तीगत स्वातंन्र्याला पुरक
3. मानवी विकासासाठी वरदान
4. देशांतर्गत शांततेसाठी उपयुक्त
5. विचाराची देवाण घेवाणीसाठी
6. एकसंघ राज्यासाठी
7. आर्थीक व सामाजिक उन्नतीसाठी
8. समता व न्यायासाठी

भारतातील मानवी हक्काची अंमलबजावणी त्रुटीः

भारतामध्ये मानवी हक्क आयोगाची स्थापना 1993 मध्ये करण्यात आली आहे. या आयोगाने मानवी हक्का संदर्भात देशपातळीवर चांगले काम केले आहे. पण काम करतांना काही गोष्टीकडे दूर्लक्ष केले असल्याचे काही घटनां व प्रसंगावरून स्पष्ट होते. जसे की, मानवी हक्क आयोगाने महिला, दलित, बाल कल्याण, जेलमधील कैदी यांच्यावर होणाऱ्या अत्याचारासंदर्भात चांगले काम केले आहे व करतही आहे, पण जेव्हा राष्ट्रीय संरक्षणार्थ सिमेवर तैनात असलेल्या सैन्यावर जम्मू –काश्मिर भागमध्ये दगड फेक केली जाते तेव्हा मानवी हक्क आयोगाला सैनिकांचे जीवन व त्यांचे हक्क दिसत नाहीत का ?, धार्मिक अत्याच होतो, लव्ह जिहाद होतो तेव्हा मानवी हक्क अयोग काय करतो ?, एखादया महिलेवर वा मुलीवर लैंगिक अत्याचार होतो तेव्हा मानवी हक्क आयोग भूमिका कोणती असते हे स्पष्ट होत नाही, जेव्हा राष्ट्राच्या एकात्मतेला व राष्ट्र विरोधी कारवायी करणारे नागरीक यांच्या विषयी सैनिक व प्रशासन कडक भूमीका घेतात तेव्हा मात्र मानवी हक्क आयोगाला मानवी

हक्काची जाणीव होते., एवढेच नाही तर जेलमध्ये असणाऱ्या कैदयांनी दूसऱ्या व्यक्तीचे हक्क हिरावून घेतलेले असतात, खुण मारामारी, भ्रष्टाचार, बलात्कार यामुळे त्यांना कैद होते तेव्हा अशा व्यक्तींनां शिक्षाही होणे अपेक्षित आहे शिक्षा झाली म्हणजे मानवी हक्क बाधीत झाले असे म्हणता योणार नाही. काही वेळा मानवी हक्क आयोगाचे विनाकारण आपले स्टेटमेंट मांडते की जेलमधील कैदयांना निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते, त्यांच्यावर जेलमध्ये अन्याय केला जातो., त्यांना व्यवस्थीत वागणूक दिली जात नाही. अशी भूमीका आयोगाने मांडणे किती उचित आहे. जे कैदेत आहेत ते उगाच कैदेत नाहीत ?ज्यांनी वाईट कृत्य केले आहे तेच कैदेत आहेत अशा व्यक्तींना जबर शिक्षा होणे हे गरजेचे आहे. कठोर शिक्षा झालीतरच कोणीतीही व्यक्ती वाईट कृत्य करणार नाही किंवा दूसऱ्याचे हक्क हिरावून घेणार नाही. भारतीय न्याय व्यवस्था ही ज्या व्यक्तीने दूसऱ्याचे हक्क हिरावून घेतले आहेत अशा व्यक्तीलाच शिक्षा करते. गुन्हेगारांना जबर शिक्षा होणे हे भारतीय दंडसहिते नुसार योग्य आहे.

भारतामध्ये मानवी हक्क आयोग स्थापन केला खरा पण मानवी हक्क आयोग हा नामधारी आयोग आहे आयोग आपले विचार मांडू शकते, शिफारस करू शकते पण एखादा निर्णय, मदत किंवा कृती करू शकत नाही. आयोगाने मानवी हक्का संदर्भात जनजागृतीचे कार्य करणे अपेक्षीत आहे. लोकांना हक्क व कर्तव्याची माहिती करून देणे आयोगाचे कार्य आहे.आयोग एखादया व्यक्तीला जाब विचारू शकते पण दोषी व्यक्तीला शिक्षा करण्याचा अधिकार नाही., भारतीय मानवी हक्क आयोगावर शासन यंत्रणेचे वर्चस्व असल्याचे दिसते., स्वतंत्र व निपक्षेची उणिव, या व अशा भारतीय मानवी हक्क अयोगासमोरीलसर्वात मोठी त्रुटी आहेत.

भारतातील मानवी हक्काच्या /मानवाधिकाराच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाय :

1. मानवी हक्क भंग करणाऱ्या व्यक्ती विरूध्द कडक कारवाई करण्यात यावी.
2. मानवी हक्क आयोगाला संपूर्ण अधिकर बहाल करावेत हा आयेग नाम मात्र नसावा.
3. आयोगाने लोकाच्या हक्का संदर्भात प्रबोधन करावे.
4. राष्ट्रहीताला प्राधान्य देण्यात यावे, जे राष्ट्रच्या विरूध्द वर्तन करतात अशांना दया दाखवू नये
5. जाती भेद व धर्म भेद नाहीसा करण्यासाठी आयोगाने प्रयत्न करावेत.
6. शाळा महाविद्यालयातून मानवी हक्काचे शिक्षण देण्यात यावे.
7. जातीवर आधारीत कोणताही राजकीय पक्ष व राजकारण नाही यासाठी कायदा करण्यात यावा.
8. समान नागरिकादयासाठी आयोगाने शासनाला शिफारस करावी जेव्हा समान नागरिकायदा अस्तित्वात येईल तेव्हा जातियता अस्तित्वात राहणार नाही.
9. काळानुसार कायदे व घटनेतील आवश्यक त्या कलमामध्ये बदल करणे आवश्यक आहे.
10. धर्मनिरपेक्षेतेची भावना प्रत्येक नागरिकामध्ये निर्माण होण्यासाठी ठोस कार्यक्रमाची आखणी करावी.
11. जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.
12. सिमावर्ती भागातील युवकांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.
13. सिमावर्ती भागातील युवकांसाठी व्यवसायाभिमुख व कौशल्याधिष्ठित शिक्षणाची व्यवस्था करणे.
14. राष्ट्रीय एकात्मतेसाठी ठोस कार्यक्रमाची आखणी करणे.

संदर्भ ग्रंथसूची :

1. www.mpscword.com
2. www.wikipedi.org
3. www.vikaspedia.in
4. www.missionmpsc.com
5. https//mr.m.wikipedia.org
6. www.unishivaji.ac.in